रयत शिक्षण संस्थेचे

सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड.

पिन - ४१५ १२४ जि.सातारा(महाराष्ट्र) पो ऑ.बॉ.नं. ३

कला, विज्ञान व वाणिज्य (कनिष्ठ व वरिष्ठ) नॅक मानांकन :

स्थापना : १९५४

(शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नित)

संस्थापक - पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील, डी.लिट.

प्राचार्य
डॉ. एम. एम. राजमाने
एम.एस्सी.पीएच.डी.

संदर्भ क्र. :
दिनांक :

# प्रमाणपत्र

दाखला देण्यात येतो की, कु. संध्या बाबुराव कदम या हया महाविद्यालयाच्या एम.फिल्. (मराठी) च्या जून 2006–2007 च्या नियमित विद्यार्थिनी असून त्यांनी एम.फिल्.साठी "क्रांतीज्योती सावित्रीबाई जोतीराव फुले' या डॉ. मा.गो.माळी लिखित चरित्र ग्रंथाचा चिकित्सक अभ्यास" या विषयावर ही प्रबंधिका डॉ.सुमन राजाराम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेली आहे. सदर प्रबंधिका महाविद्यालयामार्फत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेकडे पाठविण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे.

प्रमुख,
मराठी पदव्युत्तर अध्यापन व
संशोधन केंद्र, कराड

प्राचार्य,
सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज,
कराड.

SADGURU GADAGE MAHARAJ COLLEGE
KARAD

स्थळ : कराड
दिनांक : 23 जून, 2008

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, कु. संध्या बाबुराव कदम यांनी "क्रांतीज्योती सावित्रीबाई जोतीराव फुले' या डॉ. मा.गो.माळी लिखित चरित्र ग्रंथाचा चिकित्सक अभ्यास" या विषयावरील प्रस्तुत प्रबंधिका एम.फिल. (मराठी), माझ्या मार्गदर्शनाखाली सिध्द केली आहे.

त्यांनी उपलब्ध साहित्याचा अभ्यास करून आपल्या विषयाची स्वतंत्रपणे मांडणी केली आहे. त्यांनी केलेले हे संशोधन पूर्णपणे नवे आहे. सदर प्रबंधिकेचे काम पूर्णावस्थेत आहे व ती सादर करण्यास काहीही अडथळा नाही, याची मला खात्री वाटते.

ही प्रबंधिका अथवा यातील कोणताही भाग पूर्णपणे स्वतंत्र असून यापूर्वी अन्य कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेली नाही. म्हणून ती सादर करण्यास मी अनुमती देत आहे.

सुमन पाटील

स्थळ : कराड<br>दिनांक : 23 जून, 2008

(डॉ.सुमन राजाराम पाटील)<br>मार्गदर्शिका

# प्रतिज्ञापत्र

''क्रांतिज्योती सावित्रीबाई जोतीराव फुले' या डॉ.मा.गो.माळी लिखित चरित्र ग्रंथाचा चिकित्सक अभ्यास'' या विषयावरील प्रबंधिका मी शिवाजी विद्यापीठाच्या एम.फिल. मराठी पदवी परीक्षेसाठी लिहिली आहे. ही प्रबंधिका अथवा यातील कोणताही भाग पूर्णपणे स्वतंत्र असून यापूर्वी अन्य कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेली नाही.

स्थळ : कराड
दिनांक : ३० जून, 2008

(कु.संध्या बाबुराव कदम)
संशोधक विद्यार्थिनी

# प्रास्ताविक

‘ ‘क्रांतीज्योती सावित्रीबाई जोतीराव फुले’ या डॉ. मा. गो. माळी लिखित चरित्रग्रंथाचा चिकित्सक अभ्यास’ हा विषय प्रबंधासाठी निवडण्यात आला तो मार्गदर्शक डॉ. सुमन राजाराम पाटील व प्रा.डॉ. किरवले सर (शिवाजी विद्यापीठ) यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करुनच.

लहानपणापासूनच या व्यवहारी जगात अनेक अनुभव आले. त्यानुसार मी घडत गेले. त्यातूनच स्त्रियांवरील अन्याय, अत्याचार प्रखरतेने जाणवले म्हणूनच पेशवेकालापासूनच्या या अवस्थेला प्रतिकार करणाऱ्या सावित्रीबाई फुले यांच्यावरील साहित्य अभ्यासले. समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी झगडणारे असे हे थोर व्यक्तिमत्व मनात भावले.

महात्मा फुलेंबरोबर प्रत्येक कार्यात पुढे सरसावणाऱ्या सावित्रीबाई फुले या स्त्री शिक्षणाच्या आद्य प्रणेत्या ठरल्या. एक स्त्री शिक्षिका, मुख्याध्यापिका, संचालिका, समाजसेविका म्हणून कार्यरत असणाऱ्या सावित्रीबाई फुले या सर्वश्रेष्ठ दर्जाच्या साहित्यिक आहेत हे ज्ञात झाले आणि याच अचाट बुद्धीसामर्थ्यशाली व्यक्तिमत्वाची ओळख या समाजास पुन्हा एकदा व्हावी व त्यांचा आदर्श स्त्री समाजास मिळावा म्हणूनच ‘क्रांतीज्योती सावित्रीबाई जोतीराव फुले’ या चरित्रग्रंथाचा अभ्यास करण्यात आला आहे.

या दृष्टीने अभ्यास करताना त्यांचे जन्म व बालपण आई-वडीलांच्या छायेत गेले व वैवाहिक आयुष्य पतीच्या शैक्षणिक व सामाजिक कार्यात गेले आणि हे सर्व करत असताना त्यांनी आपला वाङ्मयीन गुण जोपासला. तेव्हा या सर्वांची मांडणी करण्याचा प्रयत्न मी या प्रबंधिकेत केला आहे.

# ऋणनिर्देश

' 'क्रांतीज्योती सावित्रीबाई जोतीराव फुले' या डॉ. मा. गो. माळी लिखित चरित्रग्रंथाचा चिकित्सक अभ्यास'' – या प्रस्तुत विषयाचा अभ्यास करीत असताना विषयाची निवड करण्यापासून ते प्रबंधाला पूर्णत्व देण्यापर्यंत मार्गदर्शकांनी माझ्यासाठी 'गुरुवर्यां'ची भूमिका बजावली. त्या माझ्या मार्गदर्शक आदरणीय डॉ. सुमन राजाराम पाटील यांनी केलेल्या मौलिक मार्गदर्शनामुळे, सहकार्यामुळे व वेळोवेळी प्रबंध पूर्ण करण्यासाठी दिलेल्या प्रेरणेमुळे हा प्रबंध पूर्ण होवू शकला. त्यांची सदैव ऋणी राहणे हे मी माझे सद्भाग्यचं समजते.

एम्.फिल्. अभ्यासक्रमाला प्रवेश घेवून तो पूर्ण करण्यासाठी सहकार्य व प्रेरणा देणारे आदरणीय प्राचार्य राजमाने सर (सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड), मराठी विभाग प्रमुख, प्रा. संभाजीराव देसाई सर, प्रा. डॉ. दिवेकर मॅडम, प्रा. सौ. रैनाक मॅडम, प्रा. सौ. निकम मॅडम, प्रा. डॉ. पाटील सर, प्रा. सुर्यमाला जाधव मॅडम, प्रा. डॉ. किरवले सर (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) या सर्वांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाले. या सर्वांचे ऋण कधीही न फिटण्यासारखे आहे.

सतत आशीर्वाद व प्रोत्साहन देणारे माझे वडील श्री.बाबूराव चंदू कदम, आई सौ. द्वारका कदम तसेच माझे भाऊ श्री. विजय (दादा), श्री सुभाष (बापू) व माझा भाचा चि. किरण यांच्या सहकार्या याबद्दल मी कृतज्ञ आहे.

मला अर्थिक सहाय्य करणारे, सतत प्रोत्साहन देणारे माझे पती श्री. शरद गणपत फडतरे, माझ्या सासूबाई व सर्व कुटुंबिय यांचेही आभार मानने मी माझे कर्तत्व समजते.

प्रबंधिकेचा अभ्यास करताना माझ्या मैत्रिणींनी कु. सुनिता मगदूम व सौ. पूनम फळे यांनीही वेळोवेळी मदत केली सहकार्याबद्दल त्यांची मी आभारी आहे.

एम्.फिल्. प्रबंधिकेसाठी आवश्यक अशी महत्त्वाची संदर्भ पुस्तके मिळवून देण्यासाठी अनेकांनी सहकार्य केले. सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज येथील ग्रंथपाल व त्यांचे सर्व सहकारी, समाजभूषण बाबूराव गोखले सार्वजनिक ग्रंथालय, सैदापूर,यांच्या सहकार्याबद्दल मी कृतज्ञ आहे.

प्रस्तुत प्रबंधिकेची संगणकाद्वारे अक्षरजुळणी करणाऱ्या श्री शारदा इन्स्टिटयुटच्या सौ. अलका उमराणी मॅडम यांचीही मी आभारी आहे.

यापुढे या सर्वांचे असेच सहकार्य मिळावे ही आशा बाळगते व सर्वांची ऋणी राहू इच्छिते.

संध्या बाबुराव कदम